महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

# महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची ६७ वी बैठक

| बैठक दिनांक | दिनांक १८- अक्टोबर -२०२१ |
|---|---|
| ठिकाण | इस्लाम जिमखाना, मरीन लाईन मुंबई |
| वेळ | दुपारी ०२.०० वाजता |

## बैठकीची इतिवृत्त

बैठकीस उपस्थित सदस्यांनी सन्माननीय सदस्य समीर गुलामनबी काझी यांची एकमताने बैठकीचे अध्यक्ष म्हणून निवड केली.

**विषय क्रमांक. १: -** सन्माननीय सदस्यांच्या रजे बाबत.

**ठराव क्रमांक. १: -** बैठकीस एकुण १० सदस्यापैंकी एकुण ९ सदस्य उपस्थित होते. मा. सदस्य ॲड श्री. खालीद बाबु कुरेशी हे अनुपस्थित होते व त्यांची रजा मंजूर करण्यात आली.

**विषय क्रमांक २:-** दिनांक ०६.१०.२०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणेबाबत.

**ठराव क्रमांक २:-** दिनांक ०६.१०.२०२१ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त कायम करण्यात आले.

**विषय क्रमांक ३:-** दुधाधारी कथडा /काझीपुरा मस्जिद ट्रस्ट, नाशिक तालुका, जिल्हा नाशिकची सर्वे नं. ९८० व ९८१ येथील मिळकतीच्या अनुषंगाने वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४० नुसार निर्णय घेणेबाबत दिनांक ०७.१०.२०२१ रोजी वक्फ मंडळाच्या समोर सुनावणी ठेवण्यात आली होती. प्रकरणांत दोन्ही पक्षकार हजर होते. अर्जदारांची सुनावणी झाली आहे. तथापी सुनावणीच्या दिवशीच उच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी असल्याचे गैरअर्जदार यांनी सुनावणीकरिता पुढील तारीख मागितली होती. या करिता वक्फ मंडळाने सदर प्रकरणात दिनांक १८.१०.२०२१ रोजी दुपारी ०२.०० वाजता इस्लाम जिमखाना, मरील लाईन्स, मुंबई येथे सुनावणी ठेवण्याचा निर्णय घेतला होता. त्यास अनुसरुन सर्व संबंधीतांना दि.११.१०.२०२१ रोजी सुनावणीची नोटीस निर्गमित करण्यात आली आहे.

**ठराव क्रमांक.३:-** सदर प्रकरणाशी संबंधित सी. आर.ए. क्र.१०२/२०१९ प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. ०८.१०.२०२१ रोजी दिलेल्या आदेशान्वये सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद यांनी पुढील

निर्णय घेण्याचे आदेशीत केलेले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशास अनुलक्षुन सदर प्रकरणाची महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळापुढे दि. १८.१०.२०२१ रोजी नियोजित असलेली सुनावणी एकमताने रद्द करण्यात आली.

या वेळी झालेल्या चर्चेत सन्माननीय सदस्य ॲड ए.यु. पठाण यांनी असे सुचित केले की या नयायालयीन आदेशात चुकीचे कलम नमूद करण्यात आलेले असल्याने सदर बाब सदर प्रकरणातील वक्फ बोर्डाचे वकील ॲड श्री. आर.ए.मोमीन यांनी मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून योग्यती दुरुस्ती करण्याची न्यायालयास विनंती करावी.

**विषय क्रमांक. ४:-** महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे उत्पन्न व खर्च या विषयीचे सादरीकरण.

**ठराव क्रमांक. ४:-** महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या उत्पन्न व खर्चाबाबतची सद्यःस्थिती मंडळाच्या पुढील बैठकीसमोर ठेवण्यात यावी. या मध्ये पुढील बाबींचा समावेश असावा. खर्चाचे शिर्ष तयार करुन त्यास मंजुरी घेण्यात यावी.

1. Balance Sheet
2. Trial Balance
3. Rent Sheet of the Waqf Institutions under direct control (Demand & Balance Amount of the rent)
4. Waqf Fund.
5. Principle of auditing is to be strictly followed.
6. An Economic Development Cell under one Chartered Accountant be appointed

**विषय क्रमांक.५:-** महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. समीर काझी यांचे सादरीकरण..

**ठराव क्रमांक.५:-** वक्फ मिळकतीच्या विकासासाठी वक्फ अधिनियम, १९९५ च्या संबंधित कलमांमधील तरदुदींनुसार तसेच, वक्फ लिज रूल्स, २०१४ मधील तरतुदींनुसार BOT तत्वावर विकास कामे पार पाडण्यासाठी एक प्रारूप आराखडा तयार करणे आवश्यक आहे. सदरच्या आराखडयांतर्गत BOT तत्वावर वक्फ जमिनींवर Commercial Complex बांधणे, शाळा, दवाखाने, इत्यादी कामे पार पाडणे इ. बाबत बैठकीच्या अध्यक्षस्थानी असलेल्या सन्माननीय सदस्य श्री. समीर काझी यांनी सादरीकरण केले. यावर सविस्तर चर्चा होवून नवीन विकास आराखडा तयार करणे, आवश्यकतेनुसार शासन निर्णय निर्गमित करण्यासंदर्भात संबंधित शासकीय विभागांकडे पाठपुरावा करणे व इतर तांत्रीक बाबी पूर्ण करण्याबाबत बैठकीत विचार करण्यात आला. सदरचा आराखडा तयार करण्यासाठी व याबाबतचे धोरण निश्चित करण्यासाठी महसुली अधिकारी, महापालिका अधिकारी, म्हाडा इ. सारख्या अभिकरणातील अधिकाऱ्यांचा समावेश करुन ५ सदस्याची एक समिती नियुक्त करण्याबाबतही चर्चा झाली. या संदर्भात खालील बाबींवर देखील चर्चा झाली.

1. Identification of 10 Waqf properties in the State for purpose of Development.
2. Framing of Economic Development Policy as per Waqf Rules.
3. Long term and short term plan for development.
4. Following committee be appointed for framing of Economic Development Policy-

| Sr. No. | Post | Name | Suggested names |
|---|---|---|---|
| 1 | Chairman | Chairperson of MSBW | - |
| 2 | Member | All Hon'ble members of the Board will be permanent invitees. | |
| 3 | Member | One in service or retired officer of the Rank of Deputy Secretary, from Revenue Department. | श्री. माधव काळे, सेवा निवृत्त उप सचिव, |
| 4 | Member | One in service or retired officer of the Rank of Deputy Secretary, from Urban Development Department. | श्री. सिकंदर अली, सेवा निवृत्त, BOT Head, Aurangabad Municipal Corporation. |
| 5 | Member | One in service or retired officer of the Rank of Deputy Secretary, from MHADA/Public Works Department. | श्री. भुषण देसाई, म्हाडा<br>श्री. राजेंद्र जवंजाळ, उप सचिव, सा.बां.वि,मंत्रालय, मुंबई |
| 6 | Member | One in service or retired officer of the Rank of Deputy Secretary, from Law and Judiciary Department. | श्री. अब्दुल रऊफ शेख, माजी मुख्य कार्यकारी अधिकारी, (सेवा निवृत्त) |
| वरील तकत्यात सुचविण्यात आलेल्या आजी/माजी अधिका-यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी पत्र लिहून ते सदर समितीत काम करण्यास इच्छुक आहे किंवा कसे, याबाबतची माहिती घ्यावी. इच्छुकते बद्दल माहिती प्राप्त झाल्यावर Whatsapp Group वर मान्यता घ्यावी. व तद्नंतर वक्फ मंडळाच्या बैठकीत दृढीकरणार्थ प्रस्ताव (मानधन, प्रवास भत्ता, इ. च्या तपशिलासह) सादर करावा. | | | |

**विषय क्रमांक. ६: -** मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय..

**ठराव क्रमांक. ६:-** प्रत्येक जिलह्यातील वक्फ फंड थकबाकीची वसुली, दीर्घ कालीन भाडेपट्टा वसुली, इ. करिता एक एजन्सी नियुक्त करून सदरची थकबाकी वसुली बाबत धोरणात्मक निर्णय घेण्यास सहकार्य करण्या करिता पुढील तक्त्यात

नमूद केल्याप्रमाणे वक्फ मंडळाच्या एका सन्माननीय सदस्याचा समावेश असलेली जिल्हानिहाय एक सदस्यीय पालक समिती नियुक्त करण्याचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.

| अ.क्र. | सन्माननीय सदस्यांचे नांव | अधीनस्त जिल्हे |
|---|---|---|
| १ | मा. खासदार सय्यद इम्तियाज जलील | १. औरंगाबाद<br>२. जालना |
| २ | मा. खासदार डॉ. फौजिया तेहसीन अहमद खान, | १. परभणी<br>२. हिंगोली<br>३. नांदेड |
| ३ | मा. डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा | १. अमरावती विभाग |
| ४ | मा. ॲड. खालीद बाबू कुरैशी | १. मुंबई उपनगर |
| ५ | मा. डॉ.मुदस्सीर निसार लांबे | १. ठाणे<br>२. पालघर<br>३. रायगड<br>४. रत्नागिरी<br>५. सिंधुदुर्ग<br>६. नाशिक विभाग |
| ६ | मा. ॲड. ए. यु. पठाण | १. पुणे<br>२. सांगली<br>३. सातारा<br>४. कोल्हापुर |
| ७ | मा. समीर गुलामनबी काझी | १. सोलापुर<br>२. बीड<br>३. उस्मनाबाद<br>४. लातुर |
| ८ | मा. मौलाना हसनैन शाकीर | १. नागपुर विभाग |
| ९ | मा. मौलाना सय्यद अतहर अली | १. मुंबई शहर |

ठराव क्रमांक. ७:- महसुली अधिकाऱ्यांना व वक्फ अधिनियम, १९९५ बाबत प्रशिक्षण देण्याकरिता तसेच, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या कर्मचाऱ्यांना देखील प्रशिक्षण देण्याकरिता एक ३ दिवसीय प्रशिक्षण शिबीर आयोजित यावे, असा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला

| अ. क्र. | माननीय सदस्यांचे नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | मा. समीर गुलामनबी काझी,<br>मा. अध्यक्ष | |
| २ | मा. खासदार सय्यद इम्तियाज जलील | |

| | | |
|---|---|---|
| | मा. सदस्य | |
| ३ | मा. खासदार डॉ. फौजिया तेहसीन अहमद खान,<br>मा. सदस्या | |
| ४ | मा. ॲड. खालीद बाबू कुरैशी<br>मा. सदस्य | |
| ५ | मा. डॉ.मुदस्सीर निसार लांबे<br>मा. सदस्य | |
| ६ | मा. डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा<br>मा. सदस्य | |
| ७ | मा. ॲड. ए. यु. पठाण,<br>मा. सदस्य | |
| ८ | मा. इम्तियाज मुश्ताक काझी,<br>सह सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग<br>तथा मा. सदस्य | |
| ९ | मा. मौलाना हसनैन शाकीर,<br>मा. सदस्य | |
| १० | मा. मौलाना सय्यद अतहर अली,<br>मा. सदस्य | |
| ११ | श्री. अनिस शेख,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी | |